नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक २१/०३/२०२५ (शुक्रवार)

## नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशनला राबविण्यात आली दंगा नियंत्रण योजना

नागपुर शहरात जातीय दंगली झाल्याने कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्या घटनेच्या अनुषंगाने मा. श्री हर्ष ए. पोद्दर, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण, यांनी नागपुर ग्रामीण जिल्हयात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी ,सर्व ठाणेदार यांना कडक प्रतिबंधात्मक उपयोजना राबविण्याबाबत आदेश दिले असुन त्यानुसार आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन येथे **दंगा नियंत्रण (काबु) योजना** राबविण्यात आल्या आहे. त्यात पोलीसांनी अचानक जमाव/ गर्दी झाल्यास त्यावर कसे नियत्रंण मिळवायचा याबाबत सराव करण्यात आला आहे.








# नागपुर ग्रामीण जिल्हयात शुक्रवार नमाज पठणा निमित्या लावण्यात आला कडेकोट बंदोबस्त

नागपुर ग्रामीण जिल्हयात आगामी रमजान ईद सणानिमित्य तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याकरीता मा. श्री हर्ष ए. पोद्दर, पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण,यांच्या आदेशाने नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व पोलीस स्टेशन हद्दीत आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी शुक्रवार नमाज पठणा निमित्या कडेकाट बंदोबस्त लावण्यात आला होता. बंदोबस्तासाठी हजर असलेले अंमलादार यांनी हेलमेट लाठी सह सतर्क बंदोबस्त केला. दरम्यान च्या काळात सर्व उपविभागिय पोलीस अधिकारी आणि सर्व ठाणे प्रभारी अधिकारी यांची त्यांच्या कार्यक्षेत्रात सतत पेट्रोलींग करून नमाज पठणाच्या ठिकाणी भेट दिली.







## मा.पोलीस अधिक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा यांची उमरेड येथील मशीदींना भेट

नागपुर **ग्रामीण जिल्हयातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखणे कामी तसेच** आगामी रमजान ईद सण असल्याने आज दिनांक २१/०३/२०२५ रोजी मा. श्री हर्ष ए. पोद्दार ,पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांनी पोलीस स्टेशन उमरेड येथे भेट दिली. सदर भेटी दरम्यान मा. पोलीस अधिक्षकांनी पोलीस स्टेशन उमरेड अंतर्गत उमरेड शहरातील १) जामा मशिद, २) रजा मशिद या ठिकाणी येथे भेट दिली. त्यावेळी त्यांनी मुस्लीम बांधवा सोबत संवाद साधुन कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याबाबत मार्गदर्शन केले. तसेच रमजान ईदच्या दिवशी लावण्यात येणाऱ्या बंदोबस्त संबंधाने योग्य मार्गदर्शन व सूचना दिल्या. सदर भेटी दरम्यान श्रीमती वृष्टी जैन उपविभागिय पोलीस अधिकारी तथा सहा.पोलीस अधिक्षक उमरेड उपविभाग आणि श्री धनाजी जळक, पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन उमरेड असे हजर होते.



महफ़िल-ए-नूर
शब ए बरात
13 फरवरी 2025
सैय्यद हबीब हुसैन जिलानी
मौलाना इब्राहिम रज़ा कादरी
जामा मस्जिद बुधवारी पेठ उमरेड.
मौलाना तौसीफ रज़ा साहब
हाफिज़ अकील रज़ा साहब
जामा मस्जिद





रजा मस्जिद

